RNI No. MAHBIL /2009/36619

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग एक—कोकण विभागीय पुरवणी

वर्ष ७, अंक ६५] बुधवार, डिसेंबर २९, २०२१/पौष ८, शके १९४३ [पृष्ठे ३, किंमत : रुपये ११.००

**असाधारण क्रमांक ९३**

**प्राधिकृत प्रकाशन**

### उपविभागीय अधिकारी, महाड यांजकडून

**भूमिसंपादन पुनर्वसन व पुनःस्थापना करताना उचित भरपाई मिळण्याचा पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ अन्वये**

**अधिसूचना**

क्रमांक/भूसंपादन/कात-५/केवनाळे/एस.आर ११/२०२१.—ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) याच्या कलम ३ च्या खंड (इ) च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून काढण्यात आलेली शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग क्रमांक ११/२०१४/प्र.क्र.७७/अ-२, दिनांक ११ सप्टेंबर २०१५ (यात यापुढे जिचा निर्देश " उक्त अधिसूचना " असा करण्यात आला आहे.) याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (झेड अे) मध्ये व्याख्या केलेल्या एखाद्या सार्वजनिक प्रयोजनासाठी, एखाद्या जिल्ह्यातील १०,००० हेक्टरपेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरिता भूमीसंपादन करण्याच्या संबंधात, अशा जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी, समुचित शासन असल्याचे मानण्यात येईल ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसुचनेनुसार समुचित शासन असलेल्या, रायगड जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यास यासोबत जोडलेल्या अनुसूची एक मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेली जमीन (यात यापुढे जिचा निर्देश " उक्त जमीन " असा करण्यात आला आहे.) दिनांक २२ व २३ जुलै २०२१ रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे दरड कोसळून मौजे **केवनाळे**, तालुका **पोलादपूर** येथील दरडग्रस्तांचे पुनर्वसन या सार्वजनिक प्रयोजनासाठी (यात यापुढे ज्याचा निर्देश उक्त " सार्वजनिक प्रयोजन " असा करण्यात आला आहे.) आवश्यक आहे अथवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे. असे वाटते, ज्याच्या स्वरूपाचे विवरण यासोबत जोडलेल्या अनुसूची दोनमध्ये दिलेले आहे, आणि म्हणून उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम (१) च्या तरतुदीन्वये याद्वारे असे अधिसुचित करण्यात येते की, उक्त जमिनीची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता भासण्याची शक्यता आहे;

आणि ज्याअर्थी, प्रस्तावित भूमी संपादनाच्या अनुषंगाने दरडग्रस्त व्यक्तींचे पुनर्वसन करण्यास भाग पाडणारी कारणे, यासोबत जोडलेल्या अनुसूची तीन मध्ये दिलेली आहेत. (पुनर्वसन होणार असेल तर या अनुसूचीमध्ये कारणे नमुद करावीत;)

आणि ज्याअर्थी, सामाजिक परिणाम निर्धारण सारांश यासोबत जोडलेल्या अनुसूची चार मध्ये दिलेला आहे.

आणि ज्याअर्थी, कलम ४३ च्या पोट-कलम (१) अन्वये पुनर्वसन व पुनर्वसाहत या प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील, यासोबत जोडलेल्या अनुसूची पाचमध्ये दिलेला आहे.

त्याअर्थी आता, असे घोषित करण्यात येत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम ४ अनुसार कोणतीही व्यक्ती, ही अधिसूचना प्रसिद्ध झाल्याच्या दिनाकांपासुन ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण चार खालील कार्यवाही पुर्ण होईल त्या कालावधीपर्यंत उक्त जमिनीचा अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा उक्त जमिनीवर कोणताही भार निर्माण करणार नाही.

परंतु, उक्त जमिनीच्या अथवा तिच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यावर, जिल्हाधिकाऱ्यास विशेष परिस्थितीची कारणे लेखी नमूद करून अशा मालकास उपरोक्त तरतुदीच्या प्रवर्तनातून सूट देता येईल.

परंतु आणखी असे की, जर कोणत्याही व्यक्तीने या तरतुदीचे हेतूपुरस्पर उल्लंघन केल्यामुळे तिला झालेल्या कोणत्याही हानीची किंवा क्षतीची जिल्हाधिकाऱ्यांकडून भरपाई दिली जाणार नाही ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमाखालील जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी त्यांचेकडील **आदेश क्र. साशा /भू.सं-६/दरडग्रस्तांचे पुनर्वसन प्रस्ताव/२०२१ दिनांक २६ ऑक्टोबर २०२१** अन्वये उपविभागीय अधिकारी महाड, उपविभाग महाड यास पदनिर्देशित करण्यात आले आहे.

त्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम (५) अनुसार, जिल्हाधिकारी भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम, २०१४ (यात यापुढे ज्याचा निर्देश " उक्त नियम " असा करण्यात आला आहे.) यांच्या नियम १० च्या उप नियम (३)द्वारे विहित केल्याप्रमाणे भूमिअभिलेखाच्या अद्ययावतीकरणाचे काम हाती घेणार असल्याचे व पूर्ण करणार असल्याचे देखील घोषित करण्यात येत आहे.

## अनुसूची - एक

## जमिनीचे वर्णन

गाव केवनाळे तालुका पोलादपूर जिल्हा रायगड

| अनु.क्र. (१) | गट/सर्व्हे क्रमांक (२) | संपादन करावयाचे क्षेत्र (हे.आर) (३) |
|---|---|---|
| १ | ५१५ | ०.९७.९२ |
| २ | ५१६ | ०.०९.१० |
| ३ | ५१८ | ०.१६.५१ |
| ४ | ५१९ | ०.०१.३१ |
| ५ | ५२० | ०.३१.२२ |
| ६ | ५२२ | ०.६५.३५ |
| ७ | ४८९ | ०.०४.०७ |
| ८ | ५०६ | ००.२३.८६ |
| ९ | ५०७ | ०.०६.०९ |
| १० | ५०८ | ०.११.०० |
| ११ | ५०९ | ०.०७.०० |
| १२ | ५१० | ०.०७.०० |
| १३ | ५११ | ०.०७.०० |
| १४ | ५१२ | ०.०२.०० |
| १५ | ५१३ | ०.१२.६४ |
| १६ | ५१४ | ०.०१.८४ |
| १७ | ५२१ | ०.०१.०० |
| | **एकूण** | **३-७६-९१** |

## अनुसूची - दोन

### सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण

**प्रकल्पाचे नाव :-** मौजे **केवनाळे**, ता. **पोलादपूर** येथील दरडग्रस्तांचे पुनर्वसन.

**प्रकल्पकार्याचे वर्णन :-** दिनांक २२ व २३ जुलै २०२१ रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे, दरड कोसळून मौजे **केवनाळे**, तालुका **पोलादपूर** येथे दरड कोसळून, मोठ्या प्रमाणात जिवीत व वित्त हानी झालेली आहे त्यामुळे दरडग्रस्तांचे पुनर्वसन करणे आवश्यक आहे .

मौजे **केवनाळे**, तालुका **पोलादपूर** येथील दरडग्रस्तांचे पुनर्वसन सुरक्षित ठिकाणी करण्यासाठी **केवनाळे** येथील खाजगी जमिनी संपादन करून स्वयंसेवी संस्था मार्फत दरडग्रस्तांना घरे व इतर सोयीसुविधा उपलब्ध करून देण्याचे आहे.

**समाजाला मिळणारे लाभ:-**

दिनांक २२ व २३ जुलै २०२१ रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे, दरड कोसळून मौजे **केवनाळे**, तालुका **पोलादपूर** येथे दरड कोसळून, मोठ्या प्रमाणात जिवीत व वित्त हानी झालेली आहे. त्यामुळे दरडग्रस्तांचे पुनर्वसन करणे आवश्यक आहे.

मौजे **केवनाळे**, तालुका **पोलादपूर** येथील दरडग्रस्तांचे पुनर्वसन सुरक्षित ठिकाणी करण्यासाठी **केवनाळे** येथील खाजगी जमिनी संपादन करून स्वयंसेवी संस्था मार्फत दरडग्रस्तांना घरे व इतर सोयीसुविधा उपलब्ध करून देण्याचे आहे. आणि त्यामुळे दरडग्रस्तांना त्याचा लाभ होणार आहे.

## अनुसूची -तीन

**बाधित व्यक्तींचे पुनर्वसन करण्यास भाग पाडणारी कारणे :-**

दिनांक २२ व २३ जुलै २०२१ रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे, दरड कोसळून मौजे **केवनाळे**, तालुका **पोलादपूर** येथे दरड कोसळून जिवीत व वित्त हानी झालेली आहे. भविष्यात अशी दुर्घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही, त्यामुळे भूवैज्ञानिक रायगड-अलिबाग यांचेकडील अहवालामध्ये मौजे **केवनाळे** येथे सुरक्षित ठिकाणी दरडग्रस्तांचे पुनर्वसन करणे आवश्यक असल्याचे अभिप्राय दिलेले आहेत.

## अनुसूची -चार

**सामाजिक प्रभाव निर्धारणाचा सारांश :-** दरडग्रस्तांचे पुनर्वसन झाल्यास त्यांना त्याचा दिलासा मिळणार आहे.

## अनुसूची - पाच

**नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील**

**टीप :-** उक्त जमिनीच्या आराखडयाचे उपविभागीय अधिकारी महाड, उपविभाग महाड, जि. रायगड यांचे व तहसिलदार पोलादपूर, जि. रायगड यांचे कार्यालयामध्ये निरीक्षण करता येईल.

महाड,
दिनांक २७ डिसेंबर २०२१.

**प्रतिमा पुदलवाड-शेंगुलवार,**

उपविभागीय अधिकारी,
महाड उपविभाग, महाड.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.